ATOMIC ENERGY CENTRAL SCHOOL NO. 2, MUMBAI

PERIODIC TEST–1 (2023 – 24) Date: 20/7/23

M.M: 40 Class X Marathi Time: 90Min

Marathi- Aksharbharti(L-2,3,4,5RR)

प्रश्न क्र. 1 पुढील पठीत उतारा वाचून त्याखालील कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा. 4

दोरीवरच्या उड्यांचा फक्त एकदा प्रयत्न केला व पहिली उडीच शेवटची ठरली, कारण आठ गुणिले दहाच्या आमच्या दिवाणखान्यात प्रथम दोरी संपूर्ण फिरवणे अवघड. एकदा डोक्यावरून दोरी पलीकडे गेली ती ड्रेसिंग टेबलावरच्या तेलांच्या व औषधांच्या बाटल्या खाली घेऊन आली. दुसऱ्यांदा अर्धवट गॅलरी आणि अर्धवट घरात राहून दोरी फिरवली ती आचार्य बर्व्यांच्या गळ्यात. त्यांचा माझ्यावर आधीच राग होता. मी उपास करतो हे कळल्यावर चाळीतली सारी मंडळी समाचाराला येऊन गेली; परंतु आचार्य बाबा बर्वे शेजारच्या खोलीत असूनही आले नाहीत, कारण 'उपास' हे त्यांचे खास राखीव कुरण होते.

"हा दुष्टपणा माझ्या गळ्यात दोरी अडकवून केलात हे ठीक झालं; पण तुमच्या वयाला न शोभणाऱ्या ह्या धिंगामस्तीला दुसरा कोणी माझ्यासारखं बळी पडला असता, तर तुमची धडगत नव्हती. मी तुम्हांला क्षमा करतो."

"पण... मी हे मुद्दाम केलं नाही, आचार्य! अहो वजन कमी करायला दोरीच्या उड्या मारतोय मी."

"काही उपयोग होणार नाही!"

"का?"

"का म्हणजे? जिभेवर ताबा नाही तुमचा. संयम हवा. मनाची एकाग्रता हवी. त्यासाठी प्रथम म्हणजे काही गोष्टी सोडाव्या लागतील."

"आता ह्या उड्या मारायला मी लाजदेखील सोडली हे पाहता ना तुम्ही, बाबा?"

"ठीक आहे. प्रथम बोलणं सोडा."

"बोलणं सोडू?"

"अजिबात! खाण्यासाठी तोंडाचा वापर कमी करायचा एवढं पाहिलं तुम्ही; पण बोलण्यासाठीदेखील त्याचा वापर बंद केल्याशिवाय तुमची जीभ ताब्यात राहाणार नाही."

"पण मला बोललंच पाहिजे, बाबा." मी केविलवाण्या स्वरात ओरडलो.

"का पण? एवढा संयम नाही तुमच्यात? मौनाचं सामर्थ्य मोठं आहे. मौन ही शक्ती आहे. मौन ही..."

उड्या मारायच्या माझ्या दोरीचे एक टोक हातात धरून बाबा एक तास 'मौनाचं महत्त्व' या विषयावर बडबडत होते. शेवटी त्यांचा वाक्प्रवाह अडवून मी ओरडलो, "पण बाबा, मी बोललो नाही तर खाऊ काय?"

"म्हणजे? बोलण्याचा आणि खाण्याचा संबंध काय?"

"मी टेलिफोन-ऑपरेटर आहे, बाबा. दिवसभर बोलावंच लागतं मला."

"मग कसलं वजन उतरवणार तुम्ही?" अत्यंत कारुण्यपूर्वक कटाक्ष टाकून बाबा गेले आणि त्यांच्या गळ्यात पडलेली दोरी मघाशी मी गच्च आवळली का नाही, या विचाराने मला पश्चात्ताप झाला.

1) पु.ल. देशपांडे यांना दोरीवरच्या उड्या मारण्याचा सल्ला कोणी दिला होता?
2) दोरीवरच्या पहिल्या उडीने कोणता प्रसंग घडला?
3) दोरीवरच्या उड्या मारून उपयोग होणार नाही हे बर्वेंनी कसे पटवून दिले?
4) बाबा मी बोललो नाही तर खाऊ काय? असे पु ल देशपांडे का म्हणाले?
5) पु ल देशपांडेंना आचार्य बर्वेंचा गळा आवळावा असे का वाटले?

प्रश्न क्र. 2 पुढील पठीत कविता वाचून त्याखालील कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा. 4

दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली।।

दुनियेचा विचार हरघडी केला, आगा जगमय झालो
दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, या शाळेत शिकलो
होतो भट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले।।

1) भाकरीचा चंद्र शोधणे म्हणजे काय?
2)कवीने जवळचा मित्र कोणाला म्हटले आहे? (भाकरी/अश्रू/हात/चंद्र)
3) दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, हे कवी कोणत्या शाळेत शिकले?
4) कवीचे दिवस कसे चालले होते?
5) कवी जगमय कधी झाले?

प्रश्न क्र. 3 पुढील अपठीत उतारा वाचून त्याखालील कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा. 4

संत नामदेव महाराजांनी कठीण काळात महाराष्ट्रातील जनतेला एकत्र बांधण्याचे काम केले आहे. पंजाब मधील शब्द कीर्तन आणि महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे कीर्तन यात बरेचसे साम्य आपल्याला बघायला मिळते. पंजाब मधील घुमन येथे त्यांचे स्मारक देखील बांधण्यात आलेलं आहे. त्यांच्या आठवणीत शीख समुदायाद्वारे त्यांचे मंदिर देखील पंजाब मध्ये बांधण्यात आले आहे.

संत नामदेव महाराजांनी हिंदी भाषेत जवळपास 125 अभंगांची रचना केली होती. नामदेव महाराजांनी भक्ती गीतांच्या परंपरेला चालना दिली.

त्यांनी दोन वेळा तीर्थ यात्रा केली. जशी जशी त्यांचे वय वाढत गेले तसतशी त्यांची ख्याती जगभरात पसरत गेली. 50 वर्ष वयाचे असताना संत नामदेव महाराज हे पंढरपुरात वास्तव्याला आले. तिथे त्यांच्या आसपास सतत त्यांचे भक्त असत. त्यांचे अभंग खूप जास्त प्रसिद्ध झाले होते. लोक लांबून लांबून त्यांचे किर्तन ऐकण्यासाठी गर्दी करत होते. नामदेवांचे एकूण 2500 पेक्षा जास्त अभंग हे त्यांच्या नामदेव गाथेत आहेत.

त्यांचे गुरू ज्ञानेश्वर महाराजांचे इहलोकी गमन झाल्यानंतर ते थोडे बैचेन राहायला लागले. शेवटचे काही दिवस ते पंजाब मध्ये आले. शेवटी त्यांचे 80 वय असताना 1350 साली त्यांचे देखील देहावसन झाले.

1) संत नामदेवांचे स्मारक पंजाबात कोठे आहे?
2) संत नामदेव महाराजांनी हिंदी भाषेत किती अभंगांची रचना केली?
3) संत नामदेवांचे गुरू कोण?
4) 50 वर्ष वयाचे असताना संत नामदेव महाराज कोठे रहायला आले होते?
5) महाराष्ट्रातील जनतेसाठी संत नामदेवांनी कोणते कार्य केले?

प्रश्न क्र.4 पुढील वाक्ये सूचनेप्रमाणे बदलून लिहा.(कोणतेही दहा) 10

1. समानार्थी लिहा- ढग , चिंता , गरम, मदत (कोणतेही दोन)
2. विरूद्धार्थी करा- श्रीमंत, उच्च , शक्तिवान , वर (कोणतेही दोन)
3. लिंग बदला- मोर, कुत्रा, मुलगी, जावई (कोणतेही दोन)
4. वचन बदला- कपडा, खिडक्या, स्वप्न, शब्द (कोणतेही दोन)
5. क्षणोक्षणी - या सामासिक शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.
6. भलेबुरे - या सामासिक शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.
7. अष्टविनायक- या सामासिक शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.
8. क्रियापद ओळखा- जागतिक उष्णता वाढल्याने हिमनग वेगाने वितळतील.
9. क्रियाविशेषण अव्यय ओळखा- पूर्वी राजे-महाराजे अशा गाड्या वापरायचे.
10. केवलप्रयोगी अव्यय शोधा- भलेशाब्बास! आज तू मोठी उडी मारलीस.
11. विशेषण ओळखा-सुहासचे मोत्यासारखे अक्षर पाहून बाई आनंदित झाल्या.
12. भूतकाळ करा - श्रीधर पावसात खेळत असेल.
13. काळ ओळखा- तुम्ही उद्या गावाला जा.
14. वाक्याचा प्रकार ओळखा - या प्रश्नाचे उत्तर आहे का तुझ्याकडे?
15. विधानार्थी करा - वा! ताजमहालाचे सौंदर्य अवर्णनीयच!

प्रश्न क्र. 5 अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन ) 2

1) देशपांडे कुटुंबाने दिलेल्या शालीचा उल्लेख लेखक कोणत्या नावाने केला आहे?
2) एका महिन्यानंतर पु ल देशपांडेंचे वजन किती झाले?
3) रा.ग. जाधवांनी दिलेल्या शालीचे भिक्षेकऱ्याने काय केले?

आ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही दोन ) 2

1)पुलच्या आहारपरिवर्तनाच्या दुस-या दिवशी.........ने ऑफीसला पार्टी दिली.
2) आहारपरिवर्तनानंतर पंतांचे वजन..........पौडांनी वाढले.
3)रा ग जाधव वाईला...........चे अध्यक्ष म्हणून गेले होते.

इ) खालील प्रश्नांची उत्तरे ३० ते ४० शब्दांत लिहा. (कोणताही एक) 2
1)वजनाचा मार्ग भलत्याच काट्यातून जातो, असे पु ल देशपांडे का म्हणाले असतील?
2) रा ग जाधवांच्या बाबतीतील कृष्णा नदीच्या जवळचा प्रसंग तुमच्या शब्दात लिहा

प्रश्न क्र. 6) अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन ) 2

1)जेव्हा वासराला भूक लागते तेव्हा कोण धावत जाते?

2)पृथ्वीवर पक्षिणी कधी झेपावते?

3) हे हात माझे कधी माना उंचावलेले याचा अर्थ काय?

आ ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पूर्ण लिहा. (कोणताही एक) 1

1) 'अंकिला मी दास तुझा' असे नामदेव महाराज कोणाला म्हणतात?
(आईला/ परमेश्वराला /चातकाला / भक्ताला)

2) झोतभट्टीत शेकावे ...... तसे आयुष्य छान शेकले
(भाकरी /पोलाद /तांबे /हत्यार)

इ ) खालील काव्य ओळींचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.(कोणतीही एक) 2

1)हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले;
तेव्हा अश्रूच मित्र होऊन सहाय्यास धावून आले।

2)अग्निमाजी पडे बाळू । माता धांवे कनवाळू ।।१।।
तैसा धांवे माझिया काजा। अंकीला मी दास तुझा।।

प्रश्न क्र. 7) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही दोन) 2

1)बार्कचे दीर्घरूप कोणते?

2)'स्काय इज द लिमिट' याचा अर्थ काय?

3)"तुम्ही स्वतःचे काम स्वत: निर्माण करा; काय काम करायचे ते तुम्ही स्वतःच ठरवा," असे कोण कोणाला म्हणाले.

4)'आधी केले। मग सांगितले' याचा अर्थ काय आहे?

प्रश्न क्र. 8) खालील मुद्दे लक्षात घेऊन कोणतीही एक कथा पूर्ण करा 5

1)जंगलातील दोन प्राणी- चांगले मित्र- त्यांच्यापैकी एका प्राण्याचे बायकोला नवऱ्याच्या मित्राचे काळीज खाण्याची इच्छा झाली- तो प्राणी आपल्या मित्राला मारण्याची योजना आखतो- दुसऱ्या प्राणी युक्तीने स्वतःची सुटका करून घेतो-तात्पर्य

2)गरीब कुटुंब- कुटुंबप्रमुखाचा मृत्यू- हप्त्यावर शिलाई मशिन- लोकांचे फाटलेले कपडे शिवणे- कंपनीत शिलाईचे काम- खूप कष्ट- परिस्थितीला टक्कर- तात्पर्य

xxxxxxxx